# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)

(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ 894 /सीटीसी, पीएचओ एण्ड बीएमटीसी दि. 28.03.2018

## जाहिरात

### थेट मुलाखत (Walk in Interview)

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कॉम्प्रिहेन्सीव थॅलेसेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू.) (लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय, शीव, अंतर्गत) येथील केंद्रासाठी खालील विषयातील विविध पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | पदाचे नाव | अर्हता | पद संख्या | वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | मानद एनडोक्रोनोलॉजिस्ट (प्रौढ) Visiting Endocrinologist (Adult) | D.M. OR D.N.B (Endocrinology) or equivalent degree. | 1 | 20000/- |
| 2 | मानद क्ष-किरण शास्त्रज्ञ Visiting Radiologist | M.D. OR D.N.B (Radiology) or equivalent degree OR D.M.R.D. (Radiology) with 2 years' experience in govt. hospital will be given preference. | 1 | 20000/- |
| 3 | मानद मनोविकार तज्ञ Visiting Psychiatrist | M.D. OR D.N.B (Psychiatry) or equivalent degree OR D.P.M. (Psychiatry) with 1-year experience in govt. hospital will be given preference. | 1 | 20000/- |
| 4 | मानद संक्रमण वैद्यकिय सल्लागार Visiting Transfusion Medicine Consultant | M.D. OR D.N.B (Transfusion Med.) OR Equivalent degree. | 1 | 20000/- |
| 5 | मानद हृदयरोग तज्ञ Visiting Cardiologist | DM/DNB (Cardio) | 1 | 20000/- |
| 6 | रक्त संक्रमण अधिकारी Blood Transfusion Officer | M.D. (Pathology)/ M.B.B.S or Transfusion Medicine or equivalent degree with 1-year experience in blood banking in FDA approved blood bank will be given preference. | 2 | 50000/- |
| 7 | सहाय्यक वैद्यकिय अधिकारी Assistant Medical Officer | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा सन 1956 भारतीय वैद्यकिय मंडळाच्या अधिनियमानुसार प्रथम | 3 | 45000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वा व्दितीय अनुसूचिमध्ये समाविष्ठ असलेली अर्हता धारण करणारा असावा.<br>2. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.<br>3. सदर पदाकरीता दोन निवासी वैद्यकिय अधिकारी पदापेक्षा कमी नाही एवढा (सहा महिन्याच्या कालावधीचे प्रत्येक पद) (2 House post of 6-month duration) मान्यताप्राप्त रुग्णालयातून अनुभव धारण करणारा असावा. | | |
| 8 | स्वागत कक्ष कर्मचारी<br>Receptionist | उमेदवार मान्यता प्राप्त संस्था / विद्यापीठातून कुठल्याही क्षेत्रातील पदवी उत्तीर्ण आवश्यक. | 1 | 18000/- |
| 9 | क्ष-किरण तंत्रज्ञ<br>X-ray Technitian | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम. टी (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्यांची इंन्टर्नशीप पूर्ण केलेली असावी.<br>2. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान या मुख्य विषयासह पदवी परिक्षा (B.Sc. In Physics) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथिल क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>किंवा<br>3. उमेदवार हा 12 वी नंतर मान्यताप्रप्त संस्थेकडून / विद्यापीठातून रेडीयोग्राफी ही पदवीका (Diploma in Radiogrophy) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथिल क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>4. उमेदवारास खात्यांतर्फे घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. | 1 | 20000/- |
| 10 | भौतिकोपचारक (अर्ध वेळ)<br>Physiotherapist | B.P.T.H Degree. | 1 | 20000/- |

**वयोमर्यादाः-**

1. मानद एनडोक्रोनोलॉजिस्ट (प्रौढ) Visiting Endocrinologist (Adult): कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.
2. मानद क्ष-किरण शास्त्रज्ञ Visiting Radiologist: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.
3. मानद मनोविकार तज्ञ Visiting Psychiatrist: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.
4. मानद संक्रमण वैद्यकिय सल्लागार Visiting Transfusion Medicine Consultant: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.
5. मानद हृदयरोग तज्ञ Visiting Cardiologist: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत
6. रक्त संक्रमण अधिकारी Blood Transfusion Officer: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.

7. सहाय्यक वैद्यकिय अधिकारी Assistant Medical Officer: कमाल वयोमर्यादा 50 वर्षापर्यंत.

8. स्वागतकक्ष कर्मचारी Receptionist: कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यंत.

9. क्ष-किरण तंत्रज्ञ X-ray Technician: कमाल वयोमर्यादा 38 वर्षे पर्यंत

10. भौतिकोपचारक तज्ञ (अर्ध वेळ) Physiotherapist (Full Time): कमाल वयोमर्यादा 38 वर्षापर्यंत.

**<u>सर्वसाधारण अटीः-</u>**

1. उमेदवाराने संबंधित विषयातील आवश्यक ती मान्यताप्राप्त विद्यापीठातील/संस्थेची पदव्युत्तर पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेच्या निवडीसाठी आवश्यक असणारी तत्सम अर्हता धारण करणे आवश्यक आहे.
2. संबंधित विषयातील आवश्यक ती पदवी किंवा पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवारास व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे.
3. उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
4. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परिक्षा वा तत्सम किमान 50 गुणांची प्रश्न पत्रिका असलेला मराठी विषय, घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
5. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MSCIT OR GECT चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे किंवा नेमणूक झाल्यावर दोन वर्षाच्या कालावधीत संगणक विषयक उपरोक्त अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
6. समतुल्य अर्हता असल्यास, भारतीय वैद्यकीय परिषदेद्वारे नोंदणीकृत उमेदवारांनुसार प्राधान्यक्रम निर्धारीत करण्यात येईल.
7. उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहा पूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.
8. उमेदवाराने पदविका/पदवी परिक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नांत उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
10. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
11. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
12. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
13. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
14. निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
15. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकी नंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
16. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

17. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.
18. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

**<u>विशेष सुचना :</u>**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) जाहिरातीची सुचना त्याचप्रमाणे मुलाखतीचा कार्यक्रम कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्राच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

क) डॉक्टर व निम-वैद्यकीय कर्मचारी पदासाठी विहित नमुन्यातील अर्ज तसेच सदर पदासांठी असलेल्या अर्हता, अटी व शर्ती http://ltmgh.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

अर्जाचे विहित मुल्य अनु क्र.1 ते 6 व 9 साठी रु. 300 + 5%GST व अनु क्र 7 व 8 साठी रु 100 + 5 GST कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066 येथे (कार्यालयिन वेळेत 9 ते 4) भरून त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर सेंटर आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई – 400 066. येथे बुधवार दि. 04.04.2018 रोजी स. 09.00 वाजता थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) उपस्थित रहावे.

सही/-
<u>संचालक (वै.शि. व प्र.रु.)</u>